**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग

४ था मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई — ४०० ०३२.

दूरध्वनी क्रमांक-०२२-२२०२५१७७, ०२२२२७९४०१३ ईमेल- sudam.aandhale@nic.in

क्रमांक : संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१५२/१६ ब(ब) दिनांक :१७.१०.२०२२

**प्रति,**

जनरल सेक्रेटरी,
श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी,
करमवीर नगर, बार्शी, जि. सोलापूर
पिन-४१३ ४११

**विषय :** बिंदूनामावली तपासणीबाबत.
श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी, सोलापूर

**संदर्भ :** १) सहायक आयुक्त (मावक) पुणे यांच पत्र क्र.मावक/वशी-१/८२२/२०२२, दि.२२.०८.२०२२ चे पत्र
२) आपले दि.२२.०८.२०२२ चे पत्र व सहपत्र.

उपरोक्त संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये आपल्या संस्थेतील १) शिवाजी महाविद्यालय २) बी.पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज बार्शी जि. सोलापूर ३) कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय वाशी जि. उस्मानाबाद ४) राजर्षी शाहू विधी महाविद्यालय बार्शी, जि. सोलापूर ५) शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी, जि. सोलापूर या संस्थेतील येथील प्राचार्य व प्राध्यापक/सहायक प्राध्यापक/ग्रंथपाल/ शा.शि. संचालक या संवर्गांची सरळसेवा कोट्यातील बिंदूनामावलीची प्राथमिक तपासणी सहायक आयुक्त (मावक), पुणे यांनी संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये करुन दिली असून अंतिम तपासणीसाठी प्रस्ताव या विभागाकडे पाठविला आहे.

२. त्यानुसार उपरोक्त नमूद संवर्गातील बिंदूनामावली तपासणीस शासन मान्यता देण्यात येत असून त्याच्या टिप्पणीची साक्षांकित प्रत सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

३. तसेच येथे असेही कळविण्यात येते की, विद्यापीठांची आस्थापना उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे आहे. त्याबाबतीत वेळोवेळी धोरणांमध्ये होणारे बदल व त्यानुषंगाने निर्गमित होणाऱ्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने प्रस्ताव या विभागास प्राप्त होणे आवश्यक आहे. सबब, बिंदूनामावली तपासणी व आरक्षण निश्चितीचे प्रस्ताव उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत या विभागाकडे मान्यतेसाठी पाठविणे अपेक्षित आहे. तरी

आपल्या संस्थेने यापुढे बिंदूनामावली तपासणी व आरक्षण निश्चितीचे प्रस्ताव अंतिम तपासणीसाठी पाठवितांना उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत या विभागाच्या मान्यतेसाठी सादर करावेत.

**(सु.ए. आंधळे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**सोबत**-१) मान्यतेच्या टिप्पणीची प्रत
२)मूळ बिंदूनामावली

**प्रत:**
सहायक आयुक्त मावक, विभागीय आयुक्त कार्यालय, विधानभवन, पुणे विभाग, पुणे-१

सह सचिव (श्री. सुर्यवंशी) यांनी दिलेल्या निदेशास व उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे दि.१३.०९.२०२२ च्या पत्रास अनुसरुन पुन्हा सादर.

२. पृ.१/प.वि. वरील सहायक आयुक्त (मावक), पुणे यांचे पत्र कृपया पहावे.

३. सहायक आयुक्त (मावक), पुणे यांनी दि.२२.०८.२०२२ च्या पत्रान्वये त्यांच्या अधिनस्त असलेल्या श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित १) शिवाजी महाविद्यालय २) बी.पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज बार्शी जि. सोलापूर ३) कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय वाशी जि. उस्मानाबाद ४) राजर्षी शाहू विधी महाविद्यालय बार्शी, जि. सोलापूर ५) शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी, जि. सोलापूर या संस्थेतील प्राचार्य व प्राध्यापक/सहायक प्राध्यापक/ग्रंथपाल/ शा.शि. संचालक या संवर्गाच्या बिंदूनामावल्या अंतिम तपासणी करुन देण्याची विनंती केली आहे.

४. श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी यांनी प्राचार्य व प्राध्यापक/सहायक प्राध्यापक/ग्रंथपाल/ शा.शि. संचालक या संवर्गाच्या दि.३१.०७.२०२२ रोजीची स्थिती असलेल्या बिंदूनामावल्या अंतिम तपासणीसाठी सादर केलेल्या आहेत. परंतु सहायक आयुक्त (मावक), पुणे यांनी त्यांच्या प्राथमिक तपासणी अहवालामध्ये दि.३१.०५.२०२२ अखेरची स्थिती असलेला गोषवारा असे नमूद केले आहे. तथापि, बिंदूनामावलीमध्ये नमूद केल्यानुसार दि.३१.०७.२०२२ रोजीच्या स्थितीस अनुसरुन प्राचार्य व प्राध्यापक/सहायक प्राध्यापक/ग्रंथपाल/ शा.शि. संचालक या संवर्गाच्या बिंदूनामावलीची अंतिम तपासणी करण्यात येत आहे.

५. या कार्यासनाच्या दि.०६.०७.२०२१ व दि.२५.०२.२०२२ च्या शासन निर्णयानुसार विहित केल्याप्रमाणे सरळसेवेची बिंदूनामावली तपासण्यात येत आहे.

**सरळसेवा बिंदूनामावली : प्राचार्य, शिवाजी महाविद्यालय बार्शी, जि. सोलापूर, कला व विज्ञान (पदवी व पदव्युत्तर) (वेतनश्रेणी -AL१४)**

**या पदाची दि.३१.०७.२०२२ रोजीची स्थिती पुढीलप्रमाणे-**

| | | |
|---|---|---|
| १ | सरळसेवेची बिंदुनामावली तपासावयाचा संवर्ग | प्राचार्य, शिवाजी महाविद्यालय बार्शी, जि. सोलापूर, कला व विज्ञान (पदवी व पदव्युत्तर) वेतनश्रेणी -AL१४ |
| २ | एकूण मंजुर पदे | १ |
| ३ | सेवा प्रवेश नियमानुसार सेवा भरतीचे प्रमाण | सरळसेवा-१००% |
| ४ | सरळसेवेच्या कोटयातील पदे | १ |
| ५ | प्रस्तावासोबत प्रमाणित बिंदुनामावली सादर केली आहे काय | होय. |
| ६ | मंजुर सेवा प्रवेश नियम | दि.०८.०१.२०१९ (पृ.१०९-१९३/प.वि.) |
| ७ | मंजुर पदाचा आकृति बंध | दि.०८.०१.२०१९(पृ.८५-१०५/प.वि.)<br>सुलभ संदर्भासाठी बिंदूनामावलीतील पताका "अ" येथील तक्ता पहावा. |

या पदाची दि.३१.०७.२०२२ रोजीची स्थिती पुढीलप्रमाणे आहे:

| अ.क्र. | तपशील | अ.जा. १३% | अ.ज. ७% | वि.जा.अ ३% | भ.ज.ब २.५% | भ.ज.क ३.५% | भ.ज.ड २% | वि.मा.प्र. २% | इ.मा.व. १९% | खुला ४८% | एकूण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मंजूर पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| २ | भरलेली पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३ | रिक्त पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |

प्राचार्य, शिवाजी महाविद्यालय बार्शी, जि. सोलापूर, कला व विज्ञान (पदवी व पदव्युत्तर) वेतनश्रेणी -AL१४ या संवर्गात एकुण १ रिक्त पदाचे आरक्षण गुणवत्ता व पात्रतेनुसार खुला-१ असे राहील. या संवर्गात कार्यरत पदे निरंक आहेत. आरक्षण कायदा ३(१)(ग) नुसार एकाकी पदास आरक्षण लागू नाही.

**सरळसेवा बिंदुनामावली : प्राचार्य, शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी, जि. सोलापूर, कला,वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र (वेतनश्रेणी -AL१३A)**

**या पदाची दि.३१.०७.२०२२ रोजीची स्थिती पुढीलप्रमाणे-**

| | | |
|---|---|---|
| १ | सरळसेवेची बिंदुनामावली तपासावयाचा संवर्ग | प्राचार्य, शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी, जि. सोलापूर, कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र(वेतनश्रेणी -AL१३A) |
| २ | एकुण मंजुर पदे | ४ |
| ३ | सेवा प्रवेश नियमानुसार सेवा भरतीचे प्रमाण | सरळसेवा-१००% |
| ४ | सरळसेवेच्या कोटयातील पदे | ४ |
| ५ | प्रस्तावासोबत प्रमाणित बिंदुनामावली सादर केली आहे काय | होय. |
| ६ | मंजुर सेवा प्रवेश नियम | दि.०८.०१.२०१९ (पृ.१०९-११३/प.वि.) |
| ७ | मंजुर पदाचा आकृति बंध | दि.०८.०१.२०१९(पृ.८५-१०५/प.वि.) सुलभ संदर्भासाठी बिंदूनामावलीतील पताका "ब" येथील तक्ता पहावा. |

या पदांची दि.३१.०७.२०२२ रोजीची स्थिती पुढीलप्रमाणे आहे:

| अ.क्र. | तपशील | अ.जा. १३% | अ.ज. ७% | वि.जा.अ ३% | भ.ज.ब २.५% | भ.ज.क ३.५% | भ.ज.ड २% | वि.मा.प्र. २% | इ.मा.व. १९% | खुला ४८% | एकूण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मंजूर पदे | १ | | | | | १ | | | २ | ४ |
| २ | भरलेली पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | २ |
| ३ | रिक्त पदे | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |

प्राचार्य, शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ , बार्शी, जि. सोलापूर, कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र(वेतनश्रेणी -AL१३A) या संवर्गात १ ले पद अजा/अज आळीपाळीने, २ रे पद बिंदूनामावलीच्या क्रमानुसार विजाअ, भजब, इमाव, भजक, आदुध, भजड व विमाप्र या क्रमाने आळीपाळीने असे राहील. प्राचार्य, शिवाजी महाविद्यालय बार्शी, जि. सोलापूर, कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र(वेतनश्रेणी -AL१३A) या संवर्गात कार्यरत पदे २ आहेत. यापूर्वी अ.जा. व विजाअ प्रवर्गाचे पद भरण्यात आले नाही, अशी या विभागाची धारणा आहे. या धारणेच्या अधिन राहून सदर संवर्गात एकूण २ मंजूर पदांचे आरक्षण अजा-१ व विजाअ-१ असे राहील.

६. वरीलप्रमाणे प्राचार्य या संवर्गाची सरळसेवा कोट्याची बिंदूनामावली प्रमाणित करण्यास हरकत नसावी.

७. **प्राचार्य, शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी, जि. सोलापूर, कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र(वेतनश्रेणी -AL१३A) या संवर्गातील आरक्षणाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे-**

| अ क्र | तपशील | अजा | अज | विजाअ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | आरक्षणाचे प्रमाण /टक्केवारी | १३ | ७ | ३ | २.५ | ३.५ | २ | २ | १९ | ४८ | १०० |
| १ | मंजूर पदे | १ | | | | | १ | | | २ | ४ |
| २ | भरलेली पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | २ |
| ३ | रिक्त पदे | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| ४ | संभाव्य रिक्त पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | एकूण रिक्त पदे | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| ६ | मागणीपत्रासाठीची पदे | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |

प्राचार्य, शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी, जि. सोलापूर, कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र(वेतनश्रेणी -AL१३A) या संवर्गात एकूण २ रिक्त पदांचे आरक्षण अजा-१ व विजाअ-१ असे राहील.

८. तसेच येथे असे नमूद करण्यात येते की, प्राचार्य या संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील मंजूर पदसंख्येनुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता उपलब्ध असलेल्या १० टक्के आरक्षणानुसार येणारी पदे ही टप्प्याटप्प्याने भरावयाची असल्याने सदर पदे १० टक्के आरक्षणानुसार पूर्ण पदे भरली जाईपर्यंत खुल्या प्रवर्गाकरिता मंजूर पदांची गणना ४८ टक्के नुसार दर्शविण्यात आली आहे.

प्रथम भरती वर्षात आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता आरक्षित पदांची गणना पुढीलप्रमाणे राहील-

| एकूण भरावयाची पदे | ईडब्ल्यूएस करिता एकूण भरावयाच्या पदांच्या १० टक्केनुसार भरावयाची पदे |
|---|---|
| २ | ०.२ पुर्णांकात ० पद |

**टिप**- सहायक आयुक्त (मावक), पुणे यांनी त्यांच्या बिंदूनामावली तपासणी अहवालात ईडब्ल्यूएस संवर्गाचे भरती वर्ष ४ असे नमूद केले आहे. परंतु या विभागाने दि.१५.०७.२०१६ च्या टिप्पणीन्वये श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी, जि. सोलापूर या संस्थेतील प्राचार्य या संवर्गाची दि.०१.०४.२०१६ अखेरची स्थिती असलेली बिंदूनामावली तपासून दिली होती. (पृ.४८५/प.वि.) सबब, आता प्राचार्य संवर्गासाठी ईडब्ल्यूएस प्रवर्गाचे भरती वर्ष -१ ठरेल.

९. खालीलप्रमाणे भरावयाच्या पदांचे आरक्षण निश्चिती करुन देण्यात येत आहे.

| तपशील | अजा | अज | विजाअ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | ईडब्ल्यूएस १०% | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चालू आरक्षणाची पदे | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |

प्राचार्य, शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी, जि. सोलापूर, कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र(वेतनश्रेणी -AL१३A) या संवर्गातील २ रिक्त पदाचे आरक्षण अजा-१ व विंजाअ-१ असे राहील.

१०. सरळसेवा बिंदुनामावली : प्राध्यापक/सहायक प्राध्यापक/ग्रंथपाल/ शा.शि. संचालक

**या पदाची दि.३१.०७.२०२२ रोजीची स्थिती पुढीलप्रमाणे-**

| | | |
|---|---|---|
| १ | सरळसेवेची बिंदुनामावली तपासावयाचा संवर्ग | प्राध्यापक/सहायक प्राध्यापक/ग्रंथपाल/ शा.शि. संचालक |
| २ | एकूण मंजुर पदे | १३९ |
| ३ | सेवा प्रवेश नियमानुसार सेवा भरतीचे प्रमाण | सरळसेवा-१००% |
| ४ | सरळसेवेच्या कोटयातील पदे | १३९ |
| ५ | प्रस्तावासोबत प्रमाणित बिंदुनामावली सादर केली आहे काय | होय. |
| ६ | मंजुर सेवा प्रवेश नियम | दि.०८.०१.२०१९ (पृ.१०९-१९३/प.वि.) |
| ७ | मंजुर पदाचा आकृति बंध | दि.०८.०१.२०१९(पृ.८५-१०५/प.वि.)<br>सुलभ संदर्भासाठी बिंदूनामावलीतील पताका "क" येथील तक्ता पहावा. |

या पदाची दि.३१.०७.२०२२ रोजीची स्थिती पुढीलप्रमाणे आहे:

| अ.क्र. | तपशील | अ.जा. १३% | अ.ज. ७% | वि.जा.अ ३% | भ.ज.ब २.५% | भ.ज.क ३.५% | भ.ज.ड २% | वि.मा.प्र. २% | इ.मा.व. १९% | खुला ४८% | एकूण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मंजूर पदे | १८ | १० | ४ | ३ | ५ | ३ | ३ | २६ | ६७ | १३९ |
| २ | भरलेली पदे | १८ | ७ | ३ | ० | ४ | ० | ० | ७ | ४६ | ८५ |
| ३ | रिक्त पदे | ० | ३ | १ | ३ | १ | ३ | ३ | १९ | २१ | ५४ |

प्राध्यापक/सहायक प्राध्यापक/ग्रंथपाल/ शा.शि. संचालक या संवर्गात १३९ मंजूर पदांचे आरक्षण अ.जा.-१८, अज-१०, विजाअ-४,भजब-३,भजक-५,भजड-३, विमाप्र-३, इमाव-२६ व खुला-६७ असे राहील. तसेच सदर संवर्गात एकूण ५४ रिक्त पदांचे आरक्षण अ.ज.-३, विजाअ-१,भजब-३,भजक-१,भजड-३, विमाप्र-३, इमाव-१९ व खुला-२१ असे राहील.

११. वरीलप्रमाणे प्राध्यापक/सहायक प्राध्यापक/ग्रंथपाल/ शा.शि. संचालक या संवर्गाची सरळसेवा कोट्याची बिंदूनामावली प्रमाणित करण्यास हरकत नसावी.

१२. **आरक्षँणाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे-**

| अ क्र | तपशील | अजा | अज | विजाअ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | आरक्षणाचे प्रमाण /टक्केवारी | १३ | ७ | ३ | २.५ | ३.५ | २ | २ | १९ | ४८ | १०० |
| १ | मंजूर पदे | १८ | १० | ४ | ३ | ५ | ३ | ३ | २६ | ६७ | १३९ |
| २ | भरलेली पदे | १८ | ७ | ३ | ० | ४ | ० | ० | ७ | ४६ | ८५ |
| ३ | रिक्त पदे | ० | ३ | १ | ३ | १ | ३ | ३ | १९ | २१ | ५४ |
| ४ | संभाव्य रिक्त पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ४ | ४ |
| ५ | एकूण रिक्त पदे | ० | ३ | १ | ३ | १ | ३ | ३ | १९ | २५ | ५८ |
| ६ | प्रत्यक्षात पदभरतीस मान्यता असलेली पदे | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १९ |
| ७ | मागणीपत्रासाठीची पदे | ० | १ | ० | १ | ० | १ | १ | ७ | ८ | १९ |

**टिप**-सदर संस्थेने दि.३१.०७.२०२२ रोजीची स्थिती असलेली बिंदूनामावली तपासणीसाठी सादर केलेली असल्याने जुलै, २०२३ अखेरीची संभाव्य रिक्तता विचारात घेणे आवश्यक आहे. त्यानुसार सेवानिवृत्तीने खुला प्रवर्गात ४ पदे रिक्त होत आहेत. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर यांच्या दि.१४.०६.२०१९ च्या पत्रानुसार १९ शिक्षकीय पदे भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. (पृ ६९-७३/प.वि.)

प्राध्यापक/सहायक प्राध्यापक/ग्रंथपाल/ शा.शि. संचालक या संवर्गात एकूण १९ रिक्त पदांचे आरक्षण अज-१, भजब-१, भजड-१, विमाप्र-१, इमाव-७ व खुला-८ असे राहील.

१३. तसेच येथे असे नमूद करण्यात येते की, प्राध्यापक/सहायक प्राध्यापक/ग्रंथपाल/ शा.शि. संचालक या संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील मंजूर पदसंख्येनुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता उपलब्ध असलेल्या १० टक्के आरक्षणानुसार येणारी पदें ही टप्प्याटप्प्याने भरावयाची असल्याने सदर पदे १० टक्के आरक्षणानुसार पूर्ण पदे भरली जाईपर्यंत खुल्या प्रवर्गाकरिता मंजूर पदांची गणना ४८ टक्के नुसार दर्शविण्यात आली आहेत.

दुसऱ्या भरती वर्षात आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता आरक्षित पदांची गणनां पुढीलप्रमाणे राहील-

| पहिल्या भरती वर्षात एकूण भरती केलेली पदे+दूसऱ्या भरती वर्षातील भरावयाची पदे | ईडब्ल्यूएस करिता पहिल्या भरती वर्षात एकूण भरावयाच्या पदांच्या १० टक्केनुसार येणारी पदे | दुसऱ्या भरती वर्षात ईडब्ल्यूएससाठी उपलब्ध पदे | भरती प्रक्रियेअंती ईडब्ल्यूएसकरिता प्रत्यक्ष उपलब्ध पदे |
|---|---|---|---|
| २०+१९=३९ | ३९ रिक्त पदांच्या १० टक्के=३.९ पूर्णाकांत ४ पदे | स्तंभ २ प्रमाणे उपलब्ध पदे-पहिल्या भरती वर्षात भरलेली व कार्यरत ईडब्ल्यूएसची पदे ४-०=४ | ४ |

**टिप-** सहायक आयुक्त (मावक), पुणे यांनी त्यांच्या बिंदूनामावली तपासणी अहवालात ईडब्ल्यूएस संवर्गाचे भरती वर्ष ४ असे नमूद केले आहे. परंतु या विभागाने दि.१७.०७.२०१९ च्या बिंदूनामावली तपासणी प्रमाणपत्रान्वये श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी, जि. सोलापूर या संस्थेतील सहायक प्राध्यापक व शारिरीक शिक्षण संचालक या संवर्गाची दि.३१.१२.२०१८ अखेरची स्थिती असलेली बिंदूनामावली तपासून दिली होती. (पृ.३८१-३९२/प.वि.) त्यानुसार ईडब्ल्यूएस संवर्गाचे भरती वर्ष-१ होते व त्यानंतर श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी, जि. सोलापूर या संस्थेकडून सदर संवर्गांची बिंदूनामावली तपासणी करण्यात आलेली दिसून येत नाही. सबब, आता ईडब्ल्यूएस संवर्गाचे भरती वर्ष -२ ठरेल.

१४. दुसऱ्या भरती वर्षात ईडब्ल्यूएस प्रवर्गाची ४ पदे उपलब्ध होत आहेत. परंतु प्रत्यक्ष १९ पदे भरण्यास मान्यता असल्याने खालीलप्रमाणे भरावयाच्या पदांचे आरक्षण निश्चिती करुन देण्यात येत आहे.

| तपशील | अजा | अज | विजाअ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | ईडब्ल्यूएस १०% | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चालू आरक्षणाची पदे | ० | १ | ० | १ | ० | १ | १ | ७ | . ४ | ४ | १९ |

प्राध्यापक/सहायक प्राध्यापक/ग्रंथपाल/ शा.शि. संचालक या संवर्गातील १९ रिक्त पदाचे आरक्षण अज-१, भजब-१, भजड-१, विमाप्र-१, इमाव-७, ईडब्ल्यूएस-४ व खुला-४ असे राहील.

१३. वरीलप्रमाणे श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित १) शिवाजी महाविद्यालय २) बी.पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज बार्शी जि. सोलापूर ३) कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय वाशी जि. उस्मानाबाद ४) राजर्षी शाहू विधी महाविद्यालय बार्शी, जि. सोलापूर ५) शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी, जि. सोलापूर या संस्थेतील येथील प्राचार्य व प्राध्यापक/सहायक प्राध्यापक/ग्रंथपाल/ शा.शि. संचालक या संवर्गांच्या सरळसेवा कोट्याची बिंदूनामावली तपासणी व आरक्षण निश्चितीस मान्यता देण्यास हरकत नसावी. बिंदूनामावली तपासणी प्रमाणपत्र पृ.५४१/प.वि. वर मान्यतेसाठी सादर.

१४.  तसेच येथे असेही नमूद करण्यात येते की, विद्यापीठांची आस्थापना उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे आहे. त्याबाबतीत वेळोवेळी धोरणांमध्ये होणारे बदल व त्यानुषंगाने निर्गमित होणाऱ्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने प्रस्ताव या विभागास प्राप्त होणे आवश्यक आहे. सबब, बिंदूनामावली तपासणी व आरक्षण निश्चितीचे प्रस्ताव उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत या विभागाकडे मान्यतेसाठी पाठविणे अपेक्षित आहे. श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी यांनी यापुढे बिंदूनामावली तपासणी व आरक्षण निश्चितीचे प्रस्ताव अंतिम तपासणीसाठी पाठवितांना उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत या विभागाच्या मान्यतेसाठी सादर करणे आवश्यक आहे.

१५.  उपरोक्तप्रमाणे श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी, सोलापूर यांना पाठवावयाचे पत्राचे प्रारुप पृ.५३९/प.वि. वर मान्यतेसाठी सादर.

क.अ.(श्रीम. शिंदे)

अ.स.(श्री. आंधळे)

स.स.(श्री.सुर्यवंशी)

सचिव (साविस)

अवर सचिव
सामान्य प्रशासन विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२